**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ (साक्षीदार) यांचा पुरावा :–**

मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करते की,

माझे नाव : मिराबाई महादेव साळवे,

वय : ३८ वर्षे, धंदा : शेती,

राहणार : वडाळामहादेव, ता. श्रीरामपुर, जि.अहमदनगर.

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. सी. बी. अग्रवाल यांच्यातर्फे–**

**१.** मी सर्व आरोपींना ओळखते. ते माझे शेजारी आहेत. मी फिर्यादीला ओळखते. ते सुध्दा माझ्या शेजारी राहतात. आरोपी क्र. १ आजरोजी न्यायालयात हजर आहेत. फिर्यादी व आरोपी क्र.१ हे सख्खे भाउ आहेत. घटना ही अंदाजे एक वर्षापुर्वी वडाळामहादेव येथे सकाळी ९.३० वाजता घडली. घटनेच्या वेळेस मी इतर महिलांसोबत गवताच्या कामाला जात होते. त्यावेळेस फिर्यादी व आरोपीमध्ये यांच्यामधील भांडणाचा आवाज मी ऐकला. भांडणाचे कारण मला माहिती नाही. सदर भांडणामध्ये विजय बनसोडे यांच्या डोक्याला मार लागुन डोके फुटले असल्याचे मला नंतर माहिती झाले होते. याशिवाय मला काहीही माहित नाही. पोलिसांनी माझे बयान नोंदवुन घेतले होते.

**उलटतपास आरोपी क्र.१ ते ४ करिता वकील श्री. के. बी. शेख यांच्यातर्फे सुरु–**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबाबत संपुर्ण माहिती ही फिर्यादीची पत्नी हिने दिली. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये केवळ शाब्दीक बाचाबाची झाली होती. शाब्दीक बाचाबाची झाली याशिवाय घटनेबाबत मला काहीही माहिती नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

ठिकाण : श्रीरामपुर.
दिनांक : २८/०१/२०२५.

**(जितेंद्र दु. जाधव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, श्रीरामपुर.